दिनांक : १७.०९.२०१९

**विषय : कोजागिरी (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी ई निविदा करीता आयोजित निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त..**

कोजागिरी कॅन्टीन (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०१९-२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई निविदेसाठी निविदापूर्व बैठक दिनांक १७.०९.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता पीएमबी बिल्डींग, तिसरा मजला येथे लेखाशाखेतील समिती कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

1. M/s Akshayaa Caterers, Pune
2. M/s Lotus Services Group, Pune
3. M/s Quality Hospitality Services, Mumbai
4. M/s Ranjeet Services, Pune
5. M/s Global Hospitality Solution, Pune
6. M/s Ranjeet Hospitality Services, Pune
7. M/s Durga Caterers, Nagpur

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री. सतिश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री. सदाशिव पाटील, निबंधक
३. श्री. अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक
४. श्री .मुकुंद वीर, प्रकल्प सहायक (तांत्रिक)

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted आहे किंवा कसे या बाबतचा मुद्दा M/s Akshayaa Caterers चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | MSME चे प्रमाणपत्र जर भोजन व्यवस्था सेवेसाठी नोंदणी केली असेल व प्रमाणपत्र upload केले तर EMD व निविदा शुल्क परत करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| २. | Price Bid भरणेसाठी वार्षिक प्रशिक्षणार्थींची संख्या कळू शकेल काय असा मुद्दा M/s Lotus Services Group चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | सदरची संख्या कायम सारखीच नसते. काही एक दिवसीय, दोन /तीन /पाच दिवसीय तसेच काही ४५ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम असतात त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थींची संख्या कमी/जास्त होऊ शकते, असे सांगण्यात आले. |
| ३. | GST प्रमाण किती टक्के आहे असा मुद्दा M/s Quality Hospitality Services चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे GST रक्कम यशदाकडून प्रदान करण्यात येईल, असे सांगण्यात आले. |
| ४. | GST चे प्रमाणपत्र किंवा सध्याची फी भरल्याचे चलन प्रत सादर करावी असा मुद्दा M/s Akshayaa Caterers चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | GST चे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

(कृ.मा.प.)

(मागील पानावरुन)

| | | |
|---|---|---|
| ५. | शाकाहारी व मांसाहारी सेवा पुरविल्याचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थेचे किंवा इतर खाजगी संस्थेचे चालेल का फक्त शासकीय संस्थेचेच पाहिजे किंवा कसे या बाबतचा M/s Akshayaa Caterers चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | शाकाहारी व मांसाहारी सेवा पुरविल्याचे प्रमाणपत्र ज्या संस्थेस सेवा पुरविण्यात येत आहे त्या संस्थेमार्फत निर्गमित व्हावे. फक्त त्यात शाकाहारी व मांसाहारी भोजनव्यवस्था समाधानकारक चालवत असल्याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करण्यात आले. |
| ६. | सुरक्षा ठेव ही अंदाजे उलाढाल रकमेवर ३% आहे किंवा कसे मुद्दा M/s Akshayaa Caterers चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | सुरक्षा ठेव रक्कम ही '3 % of accepted cost of Tender' ऐवजी '3% of estimated cost of Tender' असे वाचावे. |
| ७. | BoQ मध्ये न्युनतम दर कसे भरायचे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | BOQ मधील Part-१ हा Excel मध्ये कशा पदधतीने भरावयाचे तसेच Part-२ हा PDF format मध्ये भरणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच Excel sheet मधील दर हे L-१ साठी ग्राह्य धरण्यात येतील. तसेच दरपत्रक ब मधील इतर निविदादारांचे न्युनतम दर मान्य करणे बंधनकारक असतील असेही स्पष्ट करण्यात आले. |
| ८. | कचरा व वेस्टेज ची विल्हेवाट कोण लावणार त्याबाबत M/s Ranjeet Services चे प्रतिनिधी यांनी विचारणा केली | यशदा भोजन व्यवस्थेसाठी अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. १४ नुसार संबंधित ठेकेदाराने संस्थेच्या आवाराबाहेर जबाबदारीने मनपा नियमानुसार कचरा व वेस्टेजची विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे, असे स्पष्ट करण्यात आले. |
| ९. | प्रत्येक वर्षी Turnover Certificate ५० लाखाचे सरसकट चालेल की फक्त केटरिंग/भोजन व्यवस्थेचेच असणे जरुरी आहे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील प्रति वर्षाचे केटरिंग/भोजन व्यवस्थेचेच Chartered Accountant यांनी दिलेले वार्षिक किमान ५० लाखाचे Turnover Certificate आवश्यक आहे, असे सांगण्यात आले. |
| १० | तांत्रिक लिफाफा क्र. ०१ च्या पडताळणीमध्ये (तांत्रिक लिफाफा) पात्र ठरलेल्या निविदाधारकांची, संस्थे मार्फत नियुक्त केलेल्या समितीमार्फत, लिफाफा क्र ०१ व तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मध्ये नमूद केलेल्या बाबींची खातरजमा निविदा धारकाने ज्या ज्या संस्थांची अनुभवाची प्रमाणपत्रे जोडली आहेत त्या त्या संस्थांना अचानक एकत्रितपणे प्रत्यक्ष भेटी देवून त्यानुसार, संबंधित उक्त ठेकेदारास पात्र वा अपात्र ठरविण्यात येईल. तसेच तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी संस्थेकडे २ दिवसात उपलब्ध करुन देणे निविदादारास बंधनकारक राहील. अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल.<br>असणार मुद्दा M/s Global Hospitality Solution चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | तांत्रिक लिफाफा क्र. ०१ च्या पडताळणीमध्ये (तांत्रिक लिफाफा) पात्र ठरलेल्या निविदाधारकांची, संस्थे मार्फत नियुक्त केलेल्या समितीमार्फत, लिफाफा क्र ०१ व तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मध्ये नमूद केलेल्या बाबींची खातरजमा करण्यासाठी आवश्यकता वाटल्यास निविदा धारकाने ज्या ज्या संस्थांची अनुभवाची प्रमाणपत्रे जोडली आहेत त्या त्या संस्थांना अचानक एकत्रितपणे प्रत्यक्ष भेटी देवून त्यानुसार, संबंधित उक्त ठेकेदारास पात्र वा अपात्र ठरविण्यात येईल. तसेच तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी संस्थेकडे २ दिवसात उपलब्ध करुन देणे निविदादारास बंधनकारक राहील. अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल. |

(पुढील पानावर)

(मागील पानावरुन)

निविदा भरणे अगोदर संबंधित सर्व निविदादारांनी संपूर्ण निविदेचे काळजीपूर्वक वाचन करुन, सर्व कागदपत्रे निविदेतील मागणीनुसार upload करण्याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने सर्व निविदादारांच्या प्रतिनिधींना सूचना देवून बैठक समाप्त करण्यात आली.

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

सदाशिव पाटील
(निबंधक)

सतिश तडकसे
(वित्तीय सल्लागार)